19 SEP 2021 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कवी काळसेकर कुटुंबीयांकडून विद्यापीठास सात लाखांचा निधी

कोल्हापूर, ता. १८ : प्रसिद्ध कवी सतीश काळसेकर आणि ऋत्विक काळसेकर यांच्या स्मृतींचे जतन करण्यासाठी त्यांच्या नावाचे पुरस्कार उत्कृष्ट कवींना देण्यात येणार आहेत. यासाठी काळसेकर कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठाकडे आज सात लाख रुपयांचा निधी सुपूर्द केला. या रकमेच्या व्याजातून 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' व 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' दरवर्षी देण्यात येणार आहेत. हा निधी सुप्रिया काळसेकर यांनी कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.



कोल्हापूर : कवी सतीश काळसेकर यांच्या स्मरणार्थ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सात लाखांचा धनादेश सुप्रिया काळसेकर यांनी दिला. शेजारी डॉ.मेघा पानसरे, डॉ. पी. एस. पाटील, आदित्य काळसेकर आदी.

सतीश काळसेकर मराठीतील नामवंत कवी, लेखक, अनुवादक, संपादक व ग्रंथसंग्राहक होते.ते लघुनियतकालिक चळवळीतील बिनीचे शिलेदार होते. वाङ्मयीन वर्तुळात एक उत्तम वाचक व ग्रंथ संग्राहक म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांच्या 'वाचणाऱ्याची रोजनिशी' या ग्रंथास साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविले होते. ऋत्विज काळसेकर हेही नव्या पिढीतील आश्वासक कवी होते. त्यांचा 'काळोखाच्या तळाशी' हा लक्षणीय संग्रह प्रकाशित आहे. काळसेकर यांचा कोल्हापूर शहराशी जवळचा ऋणानुबंध होता. मराठीतील ज्येष्ठ कवीस 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' दिला जाणार आहे; तर, ऋत्विज काळसेकर पुरस्कार नव्या पिढीतील कवीस दिला जाणार आहे. दोन्ही पुरस्कार पुढील वर्षापासून दिले जाणार आहेत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अजित चौगुले, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. मेघा पानसरे, आदित्य काळसेकर, विप्लव काळसेकर, डॉ. उदय नारकर आदी उपस्थित होते.

सकाळ

# स्पर्धा परीक्षेबाबत मंगळवारपासून व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राज्य सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने २१ ते २५ सप्टेंबर या कालावधीत स्पर्धा परीक्षा पूर्व तयारीबाबत ऑनलाईन व्याख्यानमाला होणार आहे. 'प्रिपेअरिंग फॉर कॉम्पिटीटीव्ह एक्झामिनेशन्स' असे या व्याख्यानमालेचे नाव आहे. व्याख्यानमालेत पहिले पुष्प मुख्यमंत्र्यांचे मुख्य सचिव विकास खर्गे गुंफणार आहेत. मंगळवारी (ता.२१) त्यांचे व्याख्यान सकाळी १०.४५ वाजता आहे. बुधवारी (ता.२२) दूरदर्शनचे सहायक संचालक डॉ. नरेंद्र विसपुते (आय.ए.एस) यांचे 'संरक्षण क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन मिळणार आहे. गुरुवारी (ता.२३) राज्याचे सचिव मदन नागरगोजे यांचे 'युपीएससी परीक्षांची तयारी' या विषयावर दुपारी २.४५ वाजता व्याख्यान होणार आहे. शनिवारी (ता.२५) सकाळी १०.४५ वाजता आयएफएस अधिकारी चंदुलाल तहसीलदार यांचे 'वनीकरण क्षेत्रात करिअरच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन मिळणार आहे. याच दिवशी दुपारी १२.३० वाजता आरबीई ऑफिसर पवन जिंदम यांचे आरबीआई परीक्षांची तयारी या विषयावर व्याख्यान देणार आहेत.

लोकसत्ता

# स्पर्धा परीक्षा पूर्वतयारीवर व्याख्यानमालेचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने 'स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी' या विषयावर निमंत्रितांचे व्याख्यान आयोजित केले असल्याचे शनिवारी सांगण्यात आले. या ऑनलाईन व्याख्यानांचे वेळापत्रक याप्रमाणे – २१ सप्टेंबर – विकास खारगे (मुख्यमंत्री यांचे मुख्य सचिव) , २२ सप्टेंबर – डॉ. नरेंद्र विसपुते (सहायक संचालक ,दूरदर्शन) २३सप्टेंबर – मदन नागरगोजे (सचिव महाराष्ट्र सरकार) २५ सप्टेंबर – चंदुलाल तहसीलदार (पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार), २६ सप्टेंबर –पवन जिंदम (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिकारी

सकाळ

# शिनोळीतील केंद्रात प्रवेशप्रक्रिया सुरू

कोल्हापूर, ता. १८ : सीमाभागातील मराठी भाषकांसाठी शिवाजी विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठाचा आजीवन अध्ययन विस्तार विभाग, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि लोकविकास केंद्र सुरू केले आहे. या अंतर्गत काजू प्रक्रिया उद्योग व विक्री, बटाटा व रताळी प्रक्रिया उद्योग व विक्री, टॅली, ट्रॅव्हल्स ॲन्ड टुरिझम, ड्रेस डिझायनिंग यांचा समावेश आहे. अभ्यासक्रमांचे प्रवेश शिनोळी येथील वसंत विद्यालय येथे सुरू झाले आहेत. प्रवेशासाठी नावनोंदणी करावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाने केले आहे. सीमाभागातील तरुण-तरुणींना विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांचे अध्ययन करता यावे यासाठी सरकारने विद्यापीठाच्या माध्यमातून शैक्षणिक संकुल उभारले आहे. यासाठी शिनोळी येथे जमीनही घेतली आहे. इमारत बांधून होईपर्यंत येथे खासगी जागेत भाडेतत्त्वावर अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. या अंतर्गत काजू प्रक्रिया उद्योग व विक्री, बटाटा व रताळी प्रक्रिया उद्योग व विक्री, टॅली, ट्रॅव्हल्स ॲन्ड टुरिझम, ड्रेस डिझायनिंग यांचा समावेश आहे. हे अभ्यासक्रम स्थानिक भागाची गरज व उपयुक्तता विचारात घेऊन सुरू करण्यात येत असून स्थानिकांच्या हाताला काम देण्यासाठी प्रात्यक्षिकांवर आधारित हे कोर्सेस चालविले जाणार आहेत. तसेच गरजेनुसार कोर्सेसची भर घालण्यात येणार आहे.

19 SEP 2021
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# काळसेकर कुटुंबातर्फे विद्यापीठास ७ लाखांचा निधी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मराठीतील दिवंगत कवी सतीश काळसेकर व ऋत्विज काळसेकर यांच्या नावाचा काव्य पुरस्कार देऊन दोन कवींना सन्मानित करण्यात येणार आहे. काळसेकर यांच्या वाङ्मयीन कार्याचे स्मरण म्हणून शिवाजी विद्यापीठाने दरवर्षी मराठीतील लक्षणीय काव्यलेखन करणाऱ्या कवीला पुरस्कार देण्यात यावा, अशी इच्छा सतीश काळसेकर यांच्या पत्नी सुप्रिया काळसेकर यांनी व्यक्त केली. त्यानुसार त्यांनी सात लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

कुलगुरू शिर्के म्हणाले, सतीश काळसेकर हे मराठीतील नामवंत कवी, लेखक, अनुवादक, संपादक व ग्रंथसंग्राहक होते. सतीश काळसेकर हे लघुनियतकालिक चळवळीतील बिनीचे शिलेदार होते. मराठी साहित्यातील महत्त्वाच्या कवींचा सन्मान या दोन पुरस्कारांनी होणार आहे, याचा विद्यापीठाला निश्चितच आनंद आहे.

या रकमेच्या व्याजातून 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' व 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' देण्यात येणार आहेत. मराठीतील ज्येष्ठ कवीला 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' दिला जाणार आहे, तर, ऋत्विज काळसेकर पुरस्कार नव्या पिढीतील कवीस दिला जाणार आहे. दोन्ही पुरस्कार पुढील वर्षापासून दिले जाणार आहेत.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह आदित्य काळसेकर, विप्लव काळसेकर, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. उदय नारकर, डॉ. मेघा पानसरे व ए. टी. चौगुले उपस्थित होते

पुढारी

# शासकीय जनसंपर्क हे आव्हानात्मक कार्य : संदीप माळवी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवमाध्यमांचा उदय व जनतेकडून होत असलेला अधिक वापर यामुळे शासकीय जनसंपर्काचे कार्य आव्हानात्मक बनले आहे, असे मत ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे शासकीय जनसंपर्क विषयावर आयोजित ऑनलाईन वेबिनारमध्ये ते बोलत होते. माळवी म्हणाले, आजच्या काळात जनसंपर्काचे कार्य हे परंपरागत व्याख्येपलीकडे गेले आहे. वेबिनारच्या दुसऱ्या सत्रात क्षेत्र प्रसिद्धी अधिकारी, सोलापूर अंकुश चव्हाण व पत्र सूचना कार्यालय, मुंबई येथील महेश चोपडे यांनी मार्गदर्शन केले. विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. सहयोगी प्रा. सचिन दिवाण यांनी आभार मानले.